ISSN : 2278-8204

International Monthly Research Journal For All Subjects

# AKSHARDEEP



Editor

Ganpu Lahane

| | | | |
|---|---|---|---|
| 37. | मराठी ललितगद्यातील 'मी' चे स्वरुप | वैभव माने | 200 |
| 38 | 'विमुक्ती' या नियतकालिकांतील महिला विशेषांकाचे आस्वादात्मक / समीक्षालेखन (सुजान कुटुंबाचा समृद्ध साथीदार) (२००१ ते २०१०) | प्रा. उमा काळे | 203 |
| 39. | आदिवासी ठाकरांचे सामाजिक जीवन | प्रा. डॉ. उमेश चांगदेव मुंढे | 209 |
| 40. | पंचायत राज्यव्यवस्थेतील सहभागी स्त्रीची दशा आणि राहूकेतु : एक आकलन | प्रा. संतोष निवृत्ती नागरे | 213 |
| 41. | प्रवासवर्णन : एक वाङ्मय प्रकार | प्रा. आर. एल. वोबडे | 219 |
| 42. | 'पाचोळा' तील वदलते कौटुंविक जीवन चित्रण | प्रा. चंद्रकांत शेरखाने | 223 |
| 43. | "म. जोतिराव फुले, सावित्रीवाई फुले - समाज प्रवोधन" | प्रा. शेलार राजेंद्र मच्छिंद्र | 227 |
| 44. | नव्वदनंतरच्या ग्रामीण कवितेतून येणारे पावसाचे संदर्भ | डॉ. वैजनाथ पंडितराव कदम | 230 |
| 45. | "राजर्षी शाहू महाराजांचे प्रमुख आर्थिक विचार : एक अभ्यास" | प्रा.डॉ.पी.एम.शिंदे, | 235 |
| 46. | भारतीय समाजातील अंधश्रध्देचे विविध प्रकार | प्रा. मुंडे रामकिशन हरीदास | 239 |
| 47. | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार व कार्य | प्रा.डी.के.कदम | 244 |
| 48. | पंडित जवाहरलाल नेहरुंचे राष्ट्रवाद विषयक विचार | प्रा. संतोष शंकरराव इंगोले | 249 |
| 49. | एम.एन.रॉय यांचा मूलगामी मानवतावाद | प्रा.पांचाळ अविनाश भगवानराव | 253 |
| 50. | भारतीय संविधान व मूलभूत अधिकाराची स्थिती | प्र.ा प्रदिप उस. आढे | 256 |
| 51. | प्रादेशिक इतिहास : हिमायतनगर (वाढोणा) | प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम | 260 |
| 52. | शिवशाहीची पुनर्मांडणी करताना मुस्लिम योगदानाच्या इतिहास लेखनाची गरज | डॉ. झाकेर पठाण | 262 |
| 53. | भारतीय अर्थव्यवस्थेतील काळा पैसा निर्मितीची कारणे व परिणाम | वडवळे आनंदा पांडूरंग | 267 |
| 54. | शिक्षेच्या उपपत्तीचा नैतिक अन्वयार्थ | पाटील वाजीराव माणिकराव | 274 |
| 55. | आपत्ती व्यवस्थापनातील नागरिकांची भूमिका | डॉ. वालाजी शंकर पिंपळे | 278 |

Research Paper
In
Sociology

International Monthly
Research Journal,
Akshardeep

ISSN 2278-8204
Vol.I. Issue : IJõ,
October, 2012


# राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार व कार्ये

प्रा.डी.के.कदम
समाजशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील
महाविद्यालय, हिमायतनगर

भारतात शेकडो वर्षे बहुजन समाज हा शिक्षणापासून वंचित राहिला होता. महाराष्ट्र ही त्यास अपवाद नव्हता. अविद्या म्हणजे शिक्षणाचा अभाव. या अविद्येने म्हणजे अज्ञानानेच बहुजन समाजास अधोगतीस नेले आहे. गुलामगिरीच्या गर्तेत ढकलेले आहे. त्यातुन सुटण्याचा एकच उपाय म्हणजे शिक्षण आहे. हे म. फुले यांनी जाणले होते म्हणून त्यांनी समाज सुधारणेसाठी शिक्षणावर भर दिला. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी हेच कार्ये आपल्या संस्थानात चालू ठेवले. म्हणून भारताच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराजांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांचा (जन्म २६ जुन १८७४ आणि मृत्यु ६ मे १९२२) हा जरी ४८ वर्षाचा असला तरी त्यांच्या कर्तबगारीचा खरा काळ २८ वर्षाचाच होता. त्यांनी त्यांच्या काळात ज्या सुधारणा घडून आणल्या त्या आज पुरोगामी महाराष्ट्राचे सरकार अंमलात आणतांना दिसून येते.

तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती. कारण समाजावर धर्म, अंधश्रध्दा व कर्मकांड यांचा प्रचंड पगडा होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत राजर्षी शाहू महाराजांनी ज्या सुधारणा घडवून आणल्या त्या उल्लेखनिय आहेत. शाहू महाराजांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. प्रस्तूत शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारांचा व कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

**शैक्षणिक विचार व कार्ये :**शिक्षणाची महती सांगताना शाहू महाराज म्हणतात, "शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे" असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशची उन्नती झाली नाही. असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मत्सुद्दी लढवय्येवीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे.' या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्यांच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्यांच्या वेळेच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळया जातीचा व्यवहारावर अनेक बंधनकारक असे निर्बंध घातले आणि कनिष्ट जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले यावरून तत्कालीन परिस्थितीत शिक्षणाची स्थिती कशी होती हे स्पष्ट होते.

ब्रिटीश सरकारने सर्वाकरिता शिक्षण खुले केले होते. परंतु या शाळांमध्ये वरिष्ठ वर्गातील पालक व मुले अस्पृश्यांना शिक्षणासाठी येवू देत नव्हते. अशासाठी शिक्षणाचे दार खुले

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.I. Issue : II8,
October, 2012

करणे हे तत्व कागदोपत्री होते कारण उच्चवर्णीयांच्या वर्णश्रेष्ठत्वाच्या दाव्या समोर ब्रिटिश सरकारही हातबल झाले होते. म्हणून ब्रिटिश सरकारने अस्पृश्यांना खास वेगळया शाळा सुरू केल्या होत्या. परंतु ही तरतुद अत्यंत जुजबी स्वरूपाची होती.

**मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण :** मागासलेल्या वर्गाची मानसिक गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी त्यांना किमान प्राथमिक शिक्षण तरी पाहिजे असे ठाम मत शाहू महाराजांचे होते. म्हणून शाहू महाराजांनी नाशिक येथील भाषणात असे उद्‌गार काढले की, खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुध्दीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी 'जु' लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची जरूरी आहे. समाज समृध्द व बलवान करण्यासाठी बहुजन समाजातून उत्तम शेतकरी, उत्तम शिक्षक, उत्तम व्यापारी, उत्तम उद्योगपती आणि उत्तम सैनिक निर्माण झाले पहिजेत त्यासाठी शिक्षण गंगेचे पाठ खेडयापाडयात गोरगरिब जनतेच्या दारापर्यंत नेले पाहिजेत. शाहू महाराज आपल्या राज्यात प्रजेसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे या विषयावर इ.स.१९१२-१३ पासून गांभीर्याने विचार करत होते. पुढे शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रचारासाठी वतनी शिक्षकासारखे काही अभिनव प्रयोगही केले होते.पण ते फार यशस्वी झाले नाहीत. त्यामुळे इ.स. १९१७ साली त्यांनी या संदर्भात निश्चित पाउल उचलले. २४ जुलै १९१७ पासून करवीर संस्थानातील प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचे असून सध्या असलेली प्राथमिक शाळातील फिस सदर दिवसापासून माफ
करण्यात येत आहे दरवर्षी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत या योजनेवर एक लाख रूपये खर्च करण्याचे ठरविण्यात आले.

शिक्षणतज्ञामार्फत शाहू महाराजांनी नियमावली तयार करून घेवून कायदा तयार केला. या कायदयान्वे शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आई-बापावर सक्ती करण्यात आली. त्यांनी मुले पाठविली नाहीत तर त्यांना प्रत्येक एक रूपया दर महिना दंड करण्याची तरतुद करण्यात आली.

**प्राथमिक शिक्षण कादयाची अंमलबजावणी :** शाहू महाराज हे शिक्षणविषयक कायदे करून थांबले नाहीत तर त्या कायदयांच्या अंमलबजावणीची जबाबदारी स्वतःवर घेतली साधारणपणे ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा सुरू केली. प्रारंभी गावातील चावडी, देवळे, धर्मशाळा यासारख्या इमारतीत शाळा सुरु केल्या. नंतर त्यांनी शाळेसाठी स्वतंत्र इमारती बांधल्या. अशा प्रकारे वर्षभरात ९६ नवीन शाळा सुरू करण्यात आल्या. शाहूमहाराज दरवर्षी प्राथमिक शिक्षणावर एक लाख रूपये खर्च करण्याचे ठरविले होते पुढे ही रक्कम तीन लाख रूपये करण्यात आली. आज ही रक्कम अत्यंत जुजबी वाटत असली तरी त्याकाळी ती फार मोठी होती कारण मुंबई सारख्या अफाट पसरलेल्या इलाख्यात ही रक्कम एक लाख रूपये एवढीच होती.

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.I. Issue : IJō,
October, 2012

शाहू महाराजांनी संस्थानातील प्रत्येक घरावर एक रूपया नाममात्र शिक्षण कराची व्यवस्था केली होती. या एक रूपयामध्ये घरातील सर्व मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. समाजातील श्रीमंतावर शाहू महाराजांनी १० ते २० टक्यांपर्यंत शिक्षण कर लावला. प्राथमिक शिक्षणासाठी स्वतंत्र्य खाते तयार केले. संस्थानातील मामलेदारापासून गावच्या पाटलापर्यंत सर्वांना त्यांनी या प्राथमिक शिक्षण चळवळीत सहभागी करून घेतले. हा कायदा करतांना तर त्यांनी खेडयापाडयातील शेतकऱ्यांच्या अडीअडचणीचे वास्तव ध्यानात घेतले होते. इ.स.१९१७ साली २७ शाळा होत्या, १२९६ मुले होती व खर्च एक लाख रूपये होता. त्यात वाढ होवून इ.स.१९२१-२२ सालापर्यंत शाळांची संख्या ४२०, व मुलांची संख्या २२००७ अशी झाली. **स्त्री-शिक्षणास प्रोत्साहन :** शाहू महाराजांनी संस्थानातील मूलीच्या शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी एक स्त्री शिक्षणाधिकाऱ्यांचे पद निर्माण केले. संस्थानात शाहू महाराजांनी स्वतंत्र अशा मुलीच्या शाळा काढल्या जेथे मुलींना स्वतंत्र्यपणे शिक्षण घेता येत नाही. अशा ठिकाणी शाहू महाराजांनी मुलांमुलींनी एकत्र शिक्षण घ्यावे यासाठी प्रोत्साहन दिले. मुलींच्या शिक्षणात शिक्षकाने विशेष रस घ्यावा म्हणून मुलांच्या शाळेत पास होणाऱ्या मुलींच्या संख्येवर त्या शिक्षकांना खास इनाम म्हणून बक्षीस दिले जात होते. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाबाबत ही महाराजांनी विशेष लक्ष घातल्याचे दिसून येते. १९१९ या एका खास हुकूमान्वये शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या स्त्रियांच्या राहण्या-जेवणाची सर्व व्यवस्था दरबाराकडून मोफत केली. हुशार मुलींना पुढील शिक्षणास प्रोत्साहन मिळावे त्यासाठी राजकन्या आक्कासाहेब महाराज यांच्या विवाहाप्रीत्यर्थ प्रत्येकी ४० रूपयांच्या अशा एकुण ५ शिष्यवृत्या चौथीच्या परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थीनींना देण्यात येत होत्या.

शाहू महाराजांनी मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीतही अत्यंत उदार दृष्टी ठेवली होती. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले होते.

**राजाराम कॉलेज :** कोल्हापुरात राजाराम कॉलेज आस्तित्वात असल्यामुळे शिक्षण महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर समाजाच्या उच्चशिक्षणाचे केंद्र बनले होते. या संस्थेचा खर्च हा २० हजार रूपये एवढा होता. या संस्थेला कोल्हापूरच्या जहागीरदारांनी मुलींची संख्या उच्च शिक्षणात वाढावी म्हणून मदत करण्याचा ठराव होतो. जहागीरदारांनी हा ठराव न पाळल्यामुळे महाराजांनी इ.स.१९१० साली ही संस्था बंद करण्याचा निर्णय घेतला. म्हणून आपल्या निर्णयाचे दुरगामी धोके लक्षात घेवून महाराजांनी जबाबदारी आर्य प्रतिनिधी या सभेवर सोपविली अनुदान देण्याचे कबूल केले.

**विद्यार्थी वस्तीगृह :** शाहू महाराजांनी महाराष्ट्रातील समाजकारणात एक नवीन संकल्पना वस्तीगृहाच्या रूपाने उदयास आणली. महाराजांनी १८ एप्रिल १९०१ रोजी व्हिक्टोरिया महाराणी बोर्डिंग या कोल्हापुरातील पहिल्या वस्तीगृहाची स्थापना केली.या वस्तीगृहात अगदी प्रारंभापासून मराठा जाती शिवाय मुसलमान, शिंपी, कोळी, माळी, गवळी अशा बहुजन समाजातील अन्य

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.I, Issue : II8,
October, 2012

जातीच्या मुलांना तेथे उदार आश्रय दिला जात होता. यातून मराठा समाजाच्या सर्व समावेशकतेचा प्रत्यय येत होता.

महाराजांनी जैन बोर्डिंग, लिंगायत, अस्पृष्य, सोनार, शिंपी, पांचाळ, गौंड सारस्वत, इंडियन ख्रिश्चन, प्रभु, वैश्य, ढोर-चांभार, सुतार नाभिक, सोमवंशीय आर्यक्षत्रिय, कोष्टी, इत्यादी विविध जाती धर्माची २० वस्तीगृहे स्थापन केली. प्रत्येक वस्तीगृहास जागा, इमारती, व उत्पन्नची कायमस्वरूपी साधने उपलब्ध करून दिली.

महाराष्ट्रातील उच्चशिक्षणाने विभूषित ब्राम्हणेतरांची पहिली पिढी घडवण्यात वस्तीगृहाचा वाटा मोलाचा आहे. त्यानंतरच्या तीन ब्राम्हणेत्तरांच्या पिढया घडविण्याचे कामे या वस्तीगृहांनी केलेले आहे. आज पश्चीम महाराष्ट्रात बहुजन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे चित्र उभे आहे त्याचा पाया छत्रपती शाहू महाराजांनी घातलेला आहे. बहुजन समाजाला अन्यायाच्या गर्तेतून वर काढण्यासाठी महाराजांनी ज्या अनेक युक्त्या वापरल्या त्यात वस्तीगृहाची युक्ती सर्वात प्रभावी ठरली.

**अस्पृश्याचे शिक्षण :** ब्राम्हणशाहीने लादलेल्या सर्वकष गुलामगिरी विरुध्द शुद्रतिशुद्रांना संघर्ष करण्यास उदयुत करणे ही सोपी गोष्ट नव्हती. त्यासाठी त्यांना शहाणे करणे, त्यांना सबल करणे आवश्यक होते. हे शिक्षण प्रसाराशिवाय होणार नाही. म्हणून त्यांनी अस्पृश्य मानलेल्या जातीत 'विद्या प्रसारक मंडळी' या नावाची संस्था स्थापन केली.

२४ नोव्हेंबर १९११ रोजी संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्वप्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. अस्पृश्य जातीतील विद्यार्थ्यांची स्थिती लक्षात घेवून पुस्तके, पाटया, पेन्सिल मोफत देण्यासाठी अडीच हजार रूपयांची तरतुद केली.

शाहू महाराजांनी अस्पृश्य मुलांच्या शाळा बंद करून इ.स.१९१९ साली त्यांना स्पृश्यांच्या मुलांच्या शाळेत अस्पृश्य मुलांना दाखल करून घेण्याचे आदेश दिले .

**सारांश :** शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणांचे परिणाम केवळ कोल्हापूर संस्थान पुरते मात्र मर्यादीत नव्हती.त्यांच्या वसतीगृह चळवळीचे एक अपत्य असलेल्या कर्मवीर भाउराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करून महाराष्ट्राच्या खेडयापाडयात शिक्षणाची सात रांगविली. अनेक ठिकाणी शाळा कॉलेज सोबत गरीब विद्यार्थ्यासाठी वस्तीगृहे स्थापन केली. विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका' हा मंत्र देवून त्यांचे स्वावलंबी जीवन बनविले. कर्मवीर भाउराव पाटलापासून ते डॉ. पंजाबराव देशमुखापर्यंत अनेक शिक्षण प्रसारकांनी सर्व महाराष्ट्रात बहुजनसमाजाला समर्थ बनविणारी शिक्षण चळवळ अर्ध शतकभर चालविली. शेकडो शाळा कॉलेज स्थापून ज्ञानगंगेचे पाट रयतेच्या झोपडीपर्यंत पोहचविले. याचाच परिणाम महाराष्ट्रात बहुजन समाजाचा अभ्युदय घडून आला. या सर्व प्रगतीची मुळे म. फूले व राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचार व कार्यात आहेत हे लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.I. Issue : IIö,
October, 2012

संदर्भ :-

१. गर्गे स.मा. ( २००३) कखीर रियासत म्युझियम ट्रस्ट कोल्हापूर

२. जाधव भ.बा. (२००१) राजर्षी शाहू महाराजांची भाषणे षाहु स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रवोधनी. कोल्हापूर

३. सुखाडे दिलीप (२०१०), राजर्षी शाहू महाराज, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद

४. पवार जयसिंगराव (२०१२), राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर

५. येडेकर श्याम, राजर्षी -एक व्यक्ती दर्शन, कोल्हापूर.